# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०५.०८.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक २४ :-** मालमत्ता धारकांनी प्रत्यक्ष झोन कार्यालयात भेट देवून किंवा ऑनलाईन पध्दतीने कर भरणा केल्यास मालमत्ता करामधील सामान्य कराचे रक्कमेवर सवलत देणेबाबत.

**ठराव क्रमांक २४ :-** महानगरपालिकेकडून आकारण्यात येणाऱ्या मालमत्ता कराचे वसुली करीता मालमत्ताधारकांना मालमत्ता कराची देयके निर्गमित करणे आवश्यक असुन दरवर्षी कराची देयके तयार करण्याची कार्यवाही आर्थीक वर्षाच्या माहे एप्रिल - मे महिन्यामध्ये पुर्ण करण्यात येवून मालमता धारकांना कराची देयके वितरीत करण्यात येतात.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे यापुर्वीचे सर्व्हेक्षण व करनिर्धारण सन २००५-२००६ मध्ये झाले असून याकरीता मालमत्तेचे करयोग्यमुल्य निश्चित करण्याकरीता अपेक्षीत मासीक भाडेदर हे सन २००२-२००३ मध्ये निर्धारीत करण्यात आले आहे. या प्रक्रियेस सुमारे १७-१८ वर्षाचा कालावधी झाला असून महानगरपालिकेचे मालमता करापासून प्राप्त होणारे उत्पन्नात वाढ होण्याचे दृष्टीकोनातून महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांचे करयोग्यमुल्य ठरविण्याकरीताचे सुधारीत मासीक अपेक्षीत भाडेदर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ चे नियम ७ अन्वये निर्धारीत करण्याची बाब प्रशासनाचे विचाराधीन होती त्याअनुषंगाने यासंदर्भातील प्रयत्न सातत्याने प्रशासनातर्फे सुरु होते. महानगरपालिकेचे सद्यास्थितीत असलेले दायीत्व, यापुर्वीचे कर निर्धारण वर्ष २००५-२००६ चे तुलनेत खर्चामध्ये झालेली वार्षीक वृध्दी, भविष्यामधील महानगरपालिकेचे आर्थीक परिस्थितीचा विचार करता प्रस्तावित करण्यात आलेली दरवाढ अत्यावश्यक असल्याने सन २०२१-२०२२ पर्यंत लागू असलेले मालमत्तांचे करयोग्य मुल्य निश्चित करण्याकरीता अपेक्षित भाडेदरामध्ये ४०% ची वाढ सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासुन लागु करण्यात आली असून सदरहू प्रस्तावास मा. प्रशासक सर्वसाधारण सभेने ठराव क्र. २२ दि. २७/०७/२२ अन्वये मान्यता प्रदान केली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण ९, कलम ९९ अन्वये सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरिता अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील इमारती तथा अकृषक खुल्या भुखंडावरील कराचे दर निश्चित करण्याकरीताच्या प्रशासकीय विषयास मा. प्रशासक सर्वसाधारण सभा ठराव क्र. १८ दि. ३०/०६/२०२२ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली असून उक्त ठरावान्वये मालमत्ता करामध्ये महानगरपालिका शिक्षण कर, सांडपाणी व्यवस्थापन कर व खुल्या भुखंडास स्वच्छता शुल्क या करांचा समावेश करण्यात आला आहे.

शहरात निर्माण होणाऱ्या दैनंदिन घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याकरीता नागरीकांकडून उपयोगीता शुल्क वसुल करण्यासंदर्भात नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. स्वमअ/२०१७/ प्र.क्र./६३६/नवि १४ दि. ११ जुलै, २०१९ अन्वये आदेश प्राप्त असून सदरहू आदेशानुसार निश्चित करण्यात आलेले दर सन २०२२-२०२३ पासून लागू करण्यात आले आहेत.

महानगरपालिकेची आर्थीक स्थिती सुधारण्याकरीता आवश्यक असलेल्या उपरोक्त उपाययोजना लागू करण्याकरीता मालमत्ता कराचे देयके जनरेट करण्यापूर्वी आज्ञावलीमध्ये सुधारणा करणे आवश्यक होते. वर नमुद संपुर्ण कार्यवाहीकरीता माहे जूलै अखेरपर्यंतचा कालावधी लागल्यामूळे सन २०२२-२०२३ करीताची मालमत्ता कराची देयके ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये जनरेट करण्यात आली आहेत. तथापि आर्थीक वर्षातील सुमारे चार महिन्यांचा कालावधी संपुष्टात आल्यामूळे निश्चित करण्यात आलेल्या वार्षीक मागणीच्या वसुलीकरीता कमी कालावधी मिळणार आहे.

सद्यस्थितीत मालमत्ता कराची वसुली महानगरपालिकेचे कर्मचारी यांचेमार्फत मालमत्ताधारंकाकडे प्रत्यक्षात भेटी देवून करण्याची पध्दत प्रचलीत आहे. सद्यस्थितीत शहराची व्याप्ती व महानगरपालिकेतील मनुष्यबळाचा तुटवडा या बाबींचा विचार करता भविष्यात प्रत्येक मालमत्तांना प्रत्यक्ष भेट देवून मालमत्ता धारकांकडून कर वसुली करणे अडचणीचे होवू शकते. त्याअनुषंगाने नागरीकांनी महानगरपालिकेच्या कर भरणा केंद्रावर प्रत्यक्ष भेट देवून किंवा ऑनलाईन पध्दतीने कर भरणा करण्याची प्रवृत्ती वृध्दींगत व्हावी याकरीता अशा पध्दतीचा अवलंब केल्यास विशेष सवलत देणे आवश्यक आहे. आजमितीस मालमत्ता करापोटीचे उत्पन्न मंदावले असून नागरीकांचा कर भरण्याकरीताचा प्रतिसाद वाढविण्याच्या अनुषंगाने सवलत घोषीत करण्याकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**अ)** चालु आर्थीक वर्ष सन २०२२-२०२३ करीताचा मालमत्ता कराचा भरणा दि. ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत प्रत्यक्ष /व्यक्तिशः संबंधीत झोन कार्यालयात जावून केल्यास मालमत्ता कराचे सामान्य करामधून, सामान्य कराच्या २% सवलत प्रस्तावीत आहे.

**ब)** चालु आर्थीक वर्ष सन २०२२-२०२३ करीताचे मालमत्ता कराचा भरणा दि. ०१ ऑक्टोंबर ते ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत प्रत्यक्ष / व्यक्तिशः संबंधीत झोन कार्यालयात जावून केल्यास मालमत्ता कराचे सामान्य करामधून, सामान्य कराच्या १% सवलत देणे प्रस्तावीत आहे.

**क)** आर्थीक वर्ष सन २०२३-२०२४ व त्यानंतर प्रत्येक आर्थीक वर्षांच्या कालावधीत एप्रिल व मे महिन्यामध्ये मालमत्ता कराचा भरणा केल्यास मालमत्ता कराचे सामान्य करामधून, सामान्य कराच्या २ % सवलत आणि जुन ते सप्टेंबर या कालावधीमध्ये, मालमत्ता कराचा भरणा केल्यास १% सवलत देणे प्रस्तावित आहे.

**ड)** ऑनलाईन पध्दतीने कर भरणा करण्याकरीता नागरीकांचा सकारात्मक प्रतिसाद प्राप्त व्हावा यास्तव सन २०२२-२०२३ करीता उपरोक्त नमुद कालावधी तसेच त्यानंतरच्या कालावधीकरीता देवू केलेल्या सवलती शिवाय अतिरिक्त १ % सवलत देणे प्रस्तावीत आहे.

उपरोक्त प्रमाणे सवलत लागू केल्यास महानगरपालिकेच्या कर भरणा केंद्रावर जावून कर भरणा करण्याची तसेच ऑनलाईन पध्दतीने कराचा भरणा करण्याची प्रवृत्ती वाढेल. तसेच सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थीक स्थिती सुधारण्याकरीता मदत होवू शकेल.

सदरहू सवलत लागू करण्याचे प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दिनांक ०५/०८/२०२२ रोजी मंजुरी प्रदान केली असून उपरोक्त प्रशासकीय विषय मा. प्रशासक तसेच सर्वसाधारण सभेच्या मान्यतेकरीता सादर करण्यात आला आहे. परंतु; सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रस्तृत अहवालाचे अवलोकन करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

**नगरसचिव**
**महानगरपालिका, अमरावती**